"नांदेड जिल्ह्यातील पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया व पालकांची भूमिका - एक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत
शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी
सादर केलेला संशोधन आराखडा

:: संशोधक ::

तालंगकर प्रतिक्षा गौतम

:: मार्गदर्शक ::

डॉ. एस. व्ही. घुले

एम.ए. (इंग्रजी, अर्थशास्त्र), एम.एड्., सेट, पीएच.डी.

प्राचार्य, महात्मा गांधी अध्यापक विद्यालय,

सिडको, नांदेड.

ऑक्टोबर - २०१७

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरण	पान क्र.
१.१	प्रस्तावना	१
१.२	संशोधनाची गरज व महत्त्व	३
१.३	संशोधनाचे शिर्षक	४
१.४	कार्यात्मक व्याख्या	५
१.५	संशोधनाची उद्दिष्ट्ये	५
१.६	गृहितके	६
१.७	संशोधन कार्यपध्दती	६
१.८	सर्वेक्षण पध्दती	७
१.९	विद्यालय सर्वेक्षण	८
१.१०	जनसंख्या	८
१.११	न्यादर्श	८
१.१२	संशोधन साधने	९
१.१३	प्रश्नावली	९
१.१४	मुलाखत	१०
१.१५	माहिती संकलन	१०
१.१६	संकलीत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन	१०
१.१७	संशोधनाची व्याप्ती	१०
१.१८	संशोधनाची मर्यादा	११
१.१९	संशोधनाचा कालावधी	११
१.२०	खर्चाचा अंदाजपत्रक	१२
१.२१	संदर्भग्रंथ सुची	१२

"नांदेड जिल्ह्यातील पूर्व - प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया व पालकांची भूमिका - एक अभ्यास"

१.१ प्रस्तावना :

शिक्षण ही संपूर्ण जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे. मूलं जन्मल्यापासून ते मृत्यूपर्यंत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात त्यांचे शिक्षण चालूच असते. ते सहज असो अथवा औपचारिक, अनौपचारिक असो. शाळांमध्ये मिळणारे शिक्षण हे औपचारिक असते. त्यामध्ये शिक्षणाचा संकुचीत अर्थ घेतला जातो.

भारतीय राज्यघटनेनुसार बालकाच्या १४ वर्षापर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले आहे. शिक्षण देणे हे सोईचे व्हावे यासाठी भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये बालकाला शिक्षण देण्यासाठी एक शिक्षण संरचना तयार करण्यात आली आहे. ती पुढील तक्त्यावरून स्पष्ट करता येईल.

*** भारतीय शिक्षण प्रणाली संरचना ***

शाळेचे स्तर	पूर्व प्राथमिक	निम्न प्राथमिक	उच्च प्राथमिक	माध्यमिक	उच्च माध्यमिक	उच्च शिक्षण
वर्ग	नर्सरी, LKG, UKG	१ ते ५	६ ते ८	९ ते १०	११ ते १२	पदवी शिक्षण
कालावधी	३ वर्ष	५ वर्षे	३ वर्षे	२ वर्षे	२ वर्षे	
बालकाचे वय	३ ते ६	६ ते ११	११ ते १४	१४ ते १६	१६ ते १८	१८ ते पुढे

सदरील संशोधनासाठी संशोधिकेने निवडलेल्या शाळेचा स्तर हा पूर्व-प्राथमिक हा आहे. यामध्ये नर्सरी, LKG, UKG या वर्गाचा समावेश होतो. यामध्ये साधारण वय वर्षे ३ ते ६ या वयोगटातील बालकाचा समावेश होतो.

राष्ट्रीय शिक्षण आयोग १९६८ आणि १९८६ मध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. मार्गदर्शक तत्त्वांच्या कलम ४५ नुसार राज्य हे ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण देईल अस नमुद केले आहे. तसेच सन २००२ मध्ये ८६ व्या घटना दुरूस्तीमध्ये कलम २१ (अ) नव्याने अंतर्भूत करुन त्या अन्वये ६ ते १४ वर्ष वयोगटातील बालकांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार देण्यात आला व केंद्र शासनाने २६/०८/२००९ मध्ये ६ ते १४ वर्ष वयोगटातील

बालकांसाठी 'बालकांचा माफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९' पारीत केला व दिनांक ०१.०४.२०१० पासून संपूर्ण देशभर लागू करण्या आला. या बाबीचा सविस्तर अभ्यास केल्यास आपल्या लक्षात येईल की, या ठिकाणी फक्त ६ ते १४ वयोगटातील मुलांचाच विचार केलेला दिसून येतो. त्या खालील म्हणजे ; २ ते ६ वयोगआतील बालकांचा यामध्ये समावेश करण्यात आला नाही. पूर्व-प्राथमिक स्तरावरील बालकांचा साधा उल्लेख ही आपल्याला पाहावयास म्ळित नाही. या कारणास्तव संशोधिकेने या वयोगटातील बालकांचा स्तर निवडला आहे. या पूर्व-प्राथमिक स्तरावरील बालकांना शिक्षण प्रवाहात आनने जरुरी आहे की ; नाही हे देखील अद्याप स्पष्ट नाही.

शिक्षण म्हणजे मुलंचा सर्वांगिण विकास होय. प्रत्येक बालक हा अनुभवातून शिकते ज्ञान प्राप्त करते. ज्ञानाची निर्मिती म्हणजे त्या बालकांची भावनीक, मानसीक मनोरचना होय. सामाजिक शिक्षण प्रक्रियेतून आपण स्वत:ला इतराना कसे समजून घ्यायचे. स्वत: भोवतालचे नातेसंबंध कसे हाताळायचे नवीन कल्पनाचा वैयक्तिक व नवीन कल्पनाचा वैयक्तिक व व्यावसायिक जिवनात वार कसा करायचा हे मुल, पालक, समाज, शिक्षक यांच्या भुमिकांतून शिकत असते, 'राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा २००५' मध्ये "मुलांना समजून घेतल्या शिवाय त्यांचा विकास योग्य दिशेने करता येणार नाही" असे म्हटले आहे. आणि मुलांना समजून घ्यायचे असेल तर त्यांच्या शाळेत काय शिकवले जाते ? कसे शिकवले जाते ? व का शिकवले जाते ? याचा अभ्यास करणे अगत्याचे आहे. बालकांच्या शिक्षण विषयक संदर्भात यशपाल समितीने ही 'ओझ्याविना शिक्षण' ही संकल्पना मांडली. यातील सर्वांत जास्त ओझे हे मुलांकडून असणाऱ्या पालकांच्या अपेक्षांचेच असते. प्रत्येक बालकात क्षमता असतात परंतू त्या बालकास समजून न घेताच त्याचा शैक्षणिक विकास करण्याचा प्रयत्न केल्यास बालकांचा सर्वांगिण विकास होवू शकत नाही. म्हणून शिक्षणात पालकांची असलेली भूमिकाही तीतकीच महत्त्वाची आहे.

डॉ. हॉवर्ड गार्डनर यांनी देखील आपल्या बहुआयामी बुद्धीमत्ता सिद्धांतात मांडले आहे की ; 'बालकांना समजून न घेता त्यांचा सर्वांगण विकास आपण साधू शकत नाही. "पर्यायाने एका बालकाचा अपूर्ण विकास हा संपूर्ण राष्ट्राला सगळ्यांच बाजुंनी कमकुवत करु शकतो." मुळात व्यक्ती विकासाचा पायाच पूर्व-प्राथमिक स्तर

आहे. त्यामूळे बालकाचा सर्वांगिण विकासाची सुरूवात या स्तरावर होत असल्याने या स्तरावरील शिक्षणाचा अभ्या होणे अती आवश्यक आहे. म्हणून संशोधिकेला या स्तराचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

"भारताचे माजी राष्ट्रपती. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी या राष्ट्राला आपल्या भाषणातून दिलेले २०२० चे बलशाली राष्ट्र निर्माणाचे स्वप्न हे प्रत्येक बालकाच्या सर्वांगीण विकासातून पूर्ण होवू शकते. असे सांगितले होते." कोणते राष्ट्र किती बलशाली, प्रगतीपथावर आहे हे अभ्यासायचे असेल तर त्या राष्ट्रातील पूर्व-प्राथमिक शिक्षण व्यवस्थेला राष्ट्राचा विकास मोजण्याचे एकक मानले जाते असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

बालकाला समजून घ्यायचे असेल तर पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण बालकाचा ८०% भावनिक, मानसिक, बौध्दिक विकास हा या वयात झालेला असतो. बालकाच्या मानसिक क्रिया कशा चालतात, त्यांच्या मनात कोणते विचार उद्भवतात, ते कशा तऱ्हेने विचार करतात. वगैरे समजावून घेणे फार महत्त्वाचे आहे. प्रत्येक बालकाला परिस्थितीचे संवेदन तिच्या मनात असलेल्या संकल्पना (Concept) प्रमाणे होत असते. आणि ह्या संकल्पना या वयात (३ ते ६) चांगल्या प्रकारे विकसित होतात. त्यामुळे ह्या संकल्पना कशा तयार होतात, त्यांचा विकास कसा होतो व कोणकोणते घटक परिणामकरतात हे समजावून घेणे अगत्याचे आहे. बौध्दिक क्षमता, भाषा विकास, शैक्षणिक विकास वगैरे महत्त्वाच्या अशा विकास व स्वरूप समजावून घेण्यासाठी बालकांचा मानसिक मनोव्यापार अभ्यासणे गरजेचे आहे. पूर्व-प्राथमिक शिक्षण हा शिक्षण विकासाचा पाया आहे. तोच जर कमकुवत राहिला तर शिक्षण विकासाची इमारत कोसळुन पडेल. त्यामुळे या स्तरावरील शिक्षणाकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. या स्तरावरील शिक्षणाचा अभ्यासक्रम अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आणि या सर्वामध्ये पालकांची भूमिका अभ्यासणे संशोधिकेला महत्त्वाचे वाटते.

१.२ संशोधनाची गरज व महत्त्व :-

१) बालकांचा सर्वांगिण विकास म्हणजे बौध्दिक, भावनिक, मानसिक, सामाजिक या कार्यक्षेत्रातील विकास होय.

२) शिक्षण प्रक्रिया ही पूर्व-प्राथमिक या स्तरापासून सुरू होते म्हणून या विषयाची गरज वाटते.

३) बालकाचा जवळपास ८०% विकास या स्तरावर होत असल्यामुळे या स्तरावरील शिक्षणाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

४) या अभ्यासामुळे पूर्व-प्राथमिक शिक्षणाची सद्य:स्थिती काय आहे हे लक्षात येण्यास मदत होईल.

५) आजच्या धावपळीच्या युगात पालकाचा तसेच शिक्षकाचा बालकांच्या वाटेला येणारा अपुरा वेळ त्यामूळे पालकाकडून तसेच शिक्षकांकडून मुलांना नीट समजून घेतले जात नाही. अपेक्षाचे ओझे मात्र मुलांवर लादले जाते. याचा त्याच्या मानसिक विकासावर परिणाम होतो का हे तपासणे गरजेचे आहे.

६) बालकाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर त्याच्या विकासावर कोण-कोणत्या घटकांचा परिणाम होतो हे अभ्यासण्यासाठी सदर विषयाची आवश्यकता वाटते.

७) मानसिकदृष्ट्या आस्थित व्यक्ती जीवनात गुन्हेगारी, व्यसनाधीनता याकडे वळु शकते. त्यामुळे पूर्व-प्राथमिक स्तरापासून मानसिक स्वास्थ्याच्या सवयी रुजविण्याचा प्रयत्न केल्यास देशाची भावी संपत्ती मानसिकदृष्ट्या सुदृढ करण्यासाठी सदर संशोधनाची आवश्यकता वाटते.

८) शिक्षक, पालक यांनी मुलांशी वागतांना कोणती काळजी घ्यावी याचे ज्ञान या संशोधनामुळे होईल.

९) प्रत्येक बालकांच्या यशाचे बिजारोप कसे करावे हे संशोधनातून कळण्यास मदत होईल.

१०) केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर यश संपादन करता येते याबाबत समाजातील अनेक शिक्षित लोकांचा समज दूर करण्यास मदत होईल.

१.३ संशोधनाचे शिर्षक :-

"नांदेड जिल्ह्यातील पूर्व-प्राथमिक शिखणाचा अभ्यासक्र, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया व पालकांची भूमिका - एक अभ्यास"

१.४ कार्यात्मक व्याख्या :-

१) नांदेड जिल्हा :- महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा.

२) पूर्व-प्राथमिक शिक्षण :- भारतीय शिक्षण व्यवस्था प्रणाली संरचनेतील शाळा या स्तरातील सर्वात पहिला स्तर ज्यामध्ये ३ ते ६ या वयोगटातील मुलांच्या शिक्षणाचा समावेश होतो.

३) अभ्यासक्रम :- अभ्यासक्रम म्हणजे अभ्यासविषय, अभ्यासेत्तर व अभ्यासपूरक उपक्रम, मूल्यमापन प्रक्रिया यांची माहिती देणारी पुस्तीका होय.

४) अध्ययन प्रक्रिया :- "अध्ययन प्रक्रिया म्हणजे एका वर्तनामुळे दुसऱ्या वर्तनात घडून येणारे, कोणतेही परिवर्तन होय."

- गिलफोर्ड

५) अध्यापन प्रक्रिया :- "विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तींना चालना देणे व त्या शक्तींचा अध्ययनासाठी जास्तीत जास्त उपयोग करता येईल अशा तऱ्हेचे वातावरण निर्माण करणे म्हणजे अध्यापन होय."

६) पालक भूमिका :- पूर्व-प्राथमिक शिक्षणात पालकांचा सहभाग कोणत्या प्रकारचा आहे हे अभ्यासणे.

७) अभ्यास :- एखाद्या घटनेची पूर्णपणे माहिती घेवून त्यावर सकारात्मक व नकारात्मक दृष्टीकोनातून विचार प्रकट करणे म्हणजे अभ्यास होय.

१.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) पूर्व प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाचा अभ्यास करणे.

२) पूर्व-प्राथमिक स्तरावरील बालकांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा अभ्यास करणे.

३) पूर्व प्राथमिक स्तरावरील बालकाच्या अध्ययनावर परिणाम करणाऱ्या घटकाचा अभ्यास करणे.

४) पूर्व प्राथमिक स्तरावरील बालकांच्या शिक्षणासंदर्भात पालकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

५) पूर्व प्राथमिक स्तरावरील बालकांच्या विकास विषयक समस्याचा अभ्यास करणे.

१.६ गृहितके :-

१) शिक्षण प्रक्रिया ही मानवी विकासांशी संबंधित असते आणि विकास शारिरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक स्तरावर होत असतो.

२) वाढ आणि विकास यांचा धनात्मक संबध असतो.

३) विकास हा परिपक्वतेवर अवलंबून असतो.

४) शिक्षण म्हणजे बालकाचा इष्ट दिशेने झालेले परिवर्तन होय.

५) अध्ययन-अध्यापन ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

६) अध्ययन-अध्यापन परस्परपूरक आहेत.

७) अभ्यासक्रम हे शिक्षकाच्या हाती असलेले विद्यार्थ्यांना घडविण्याचे साधन आहे.

१.७ संशोधन कार्यपद्धती :

शिक्षणाची प्रक्रिया व त्याबद्दलच्या परिस्थितीची पद्धतीशर ज्ञान करणे हेच शिक्षण - शास्त्राचे महत्त्वाचे कार्य आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध पद्धती किती ही प्रभावी असल्या तरी त्यांचे उगमस्थान हे पाश्चात्य राष्ट्रातील शिक्षणतज्ञांना तत्कालीन परिस्थितीत भेडसावणाऱ्या विविध शैक्षणिक समस्येत आहे. आपल्या देशाच्या शैक्षणिक गरजा कोणत्या, उद्दिष्ट्ये कोणती, समस्या कोणत्या शिक्षण पद्धतीत बदल कसा करावा लागेल यांचे ज्ञान करणे आवश्यक असते हे सर्व ज्ञान शिक्षणक्षेत्रात सतत केल्या जाणाऱ्या संशोधनातूनच प्राप्त होणारे आहे. असे ज्ञान मिळवणाऱ्या पद्धतीला शैक्षणिक संशोधन म्हणतात. हे एका शास्त्रीय पद्धतीने केले जाते त्याला त्या संशोधनाची कार्यपद्धती म्हणतात.

शैक्षणिक संशोधन विविध पद्धतीने केले जाते कालमापनावर आधारीत संशोधन पद्धतीचे खालील प्रकारे विभाजन केले जाते.

संशोधन पद्धती



१) ऐतिहासीक पद्धती :

भूतकाळाशी संबंधीत असणाऱ्या समस्या ज्या पद्धतीने सोडवल्या जातात त्यास ऐतिहासीक संशोधन पद्धती असे म्हणतात.

२) वर्णनात्मक पद्धती :

वर्तमान काळाशी संबंधीत असणाऱ्या समस्या ज्या पद्धतीने सोडवल्या जातात त्यास वर्णनात्मक संशोधन पद्धती म्हणतात.

३) प्रायोगिक पद्धती :

भविष्य काळाशी संबंधीत असणाऱ्या समस्या ज्या पद्धतीने सोडवल्या जातात त्यास प्रायोगिक संशोधन पद्धती म्हणतात.

सदर संशोधन वर्तमानकाळाशी समस्येचा अभ्यास करण्यासाठी नियोजित आहे त्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरली जाणार आहे. वर्णनात्मक अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीची निवड केली आहे.

१.८ सर्वेक्षण पद्धती :

या पद्धतीत संशोधीका ही संपूर्ण जनसंख्येच्या अभ्यास न करता त्यातून निवडलेल्या प्रतिनिधीक प्रतिदर्शकाचा अभ्यास करुन प्राप्त आधार सामुग्रीच्या आधारे जनसंख्येच्या वैशिष्ट्यासंबंधी सामान्य नियम प्रस्थापित करते या अभ्यासात प्रतिदर्शी सर्वेक्षण असे म्हणतात. जर संपूर्ण जनसंख्येचा अभ्यासकेल्यास जनसंख्या सर्वेक्षण असे म्हणतात.

अभ्यासाचे उद्दिष्ट, क्षेत्र, साधन, तंत्र विषय इ. नुसार सर्वेक्षणाचे विविध प्रकार पडतात.

१) विद्यालय सर्वेक्षण (School Survey)

२) सर्वेक्षण परिक्षण (Survey Testing)

३) सर्वेक्षण वारंवारिता (Documentory Fereauency Studies)

४) सर्वेक्षण मूल्यांकन (Survey Appraisal)

५) पाठपुराव अभ्यास (Fallow up studies

६) न्यादर्श सर्वेक्षण (Sqmple survey)

संशोधिकेने संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीच्या विद्यालय सर्वेक्षण या पद्धतीची निवड केली आहे.

१.९ विद्यालय सर्वेक्षण :

विद्यालय सर्वेक्षणात पूर्व - प्राथमिक, प्राथमिक माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च शिक्षणातील अनेक विध समस्या यांचा या प्रकारात विचार केला जातो. यामध्ये शिक्षणाची ध्येय निष्पत्ती, विद्यार्थ्यांचे संपादन, अभ्यासक्रम पद्धती, दृकश्राव्य साधने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, क्रिडा विष्ज्ञयक साहित्ये मैदान, इमारत, आर्थिक प्रश्न प्रशासकीय प्रश्न इ. अनेक विध घ्ज्ञटकांच्या संबंधात निर्माण झालेल्या असलेल्या समस्यांचा विचार केला जातो.

संशोधिकेने निवडलेल्या समस्येसाठी सदर संशोधन पद्धती योग्य ठरते. यास्तव विद्यालय सर्वेक्षण पद्धती निवडली जाणार आहे.

१.१० जनसंख्या :

संशोधिकेने नमुना ज्यातून निवडलेला आहे. असा संपूर्ण भाग म्हणजे जनसंख्या होय सदर संशोधनासाठी नांदेड शहर परिक्षेत्रातील पूर्व - प्राथमिक स्तरावरील इंग्रजीमाध्यमाच्या शाळा आणि मराठी माध्यमाच्या पूर्व - प्राथमिक शाळाची निवड करण्यात येणार आहे. त्यातही ग्रामीण आणि शहरी भागातील याचा ही विचार केला जाणार आहे. तसेच त्यांचे पालक, शिक्षक व शिक्षणतज्ज्ञाच्या बालमानसतंज्ज्ञ यांची देखील निवड करण्यात येईल.

१.११ न्यादर्श :

न्यादर्श म्हणजे संपूर्ण जनसंख्येचा एक भाग असतो. न्यादर्श म्हणजे जनसंख्येचा उपसंच असतो. संशोधक आपल्या संशोधनामध्ये ज्या जनसंख्येच्या विशिष्ट चलांचे

निरिक्षण आणि प्रथक्करणाद्वारे अभ्यास करणार असतो त्या संख्येचे छोटे प्रमाण म्हणजे नमुना किंवा न्यादर्श व त्याची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय.

सदर संशोधनासाठी स्तरीय यादृच्छीक पद्धतीचा वापर करुन एकूण जनसंख्येच्या नमूना निवड केली जाईल.

प्रस्तूत संशोधनासाठी पूर्व - प्राथमिक स्तराचे शिक्षण देणाऱ्या प्ले ग्रुप, नर्सरी, LKG, UKG, अंगणवाडी, बालवाडी मान्यता प्राप्त शाळाची निवड नमून्यात केली जाईल. सदरील नमुन्यात ग्रामीण व शहरी भाग, मराठी माध्यमाच्या शाळा व इंग्रजी माध्यमाच्या शाळा, मुले व मुली अशी विविधता असल्याने स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धत वापरुन न्यायदर्शाची निवड केली जाईल.

१.१२ संशोधनाची साधने :

संशोधनामध्ये आधार साुग्री संकलीत करणे अभिप्रेत व आवश्यक असते. संशोधन अभ्यासाच्या परिकल्पनाचे परिक्षण करुन अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी किंवा संशोधन प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी विविध प्रकारची माहिती आकडेवारी स्वरुपात आवश्यक असते ही आधार सामग्री विश्वासर्ह व वैध असने देखील संधोधनासाठी महत्त्वाचे असते. संशोधनासाठीची अशी गुणात्मक व परिणामात्मक आधार सामुग्री संकलित करण्यासाठी विविध तंत्रे, पद्धती वापरल्या जातात. त्यानाच आपण संशोधनाची साधने म्हणतो.

सदर संशोधनासाठी संशोधीकेने प्रश्नावली, मुलाखत तंत्र या साधनाची निवड केली आहे.

१.१३ प्रश्नावली :

प्रश्नावली ही प्रश्नाची एक पूर्व नियोजित क्रमाने मांडण्यात आलेली यादी असते ज्या व्यक्तीकडून प्रश्नाची टपालाने अथवा प्रत्यक्ष व्यक्तिशः दिली जाते. यात महत्त्वाची बाब म्हणजे प्रश्नावलीतील प्रश्नाची उत्तरे प्रतिसादकाची कोणती ही मदत न घेता लिखित स्वरुपात द्यावयाची असतात.

सदर संशोधनासाठी पूर्व - प्राथमिक स्तराविषयी समाजाचा दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तिचे मार्गदर्शन व मार्गदर्शकांचे मार्गदर्शन घेवून संशोधिका स्वतः प्रश्नावली प्रमाणित करुन तिचा वापर करण्यात येईल.

१.१४ मुलाखत :

मुलाखत तंत्र म्हणजे हवी असलेली माहिती प्रतिसादकाकडून समोरा - समोर परिस्थितीत प्राप्त करणे या तंत्रातून प्रतिसादकाचे विचार भावना दृष्टीकोन मोकळेपणाने व्यक्त होतात.

सदर संशोधनात संशाधिका न्यादर्श निवड झालेल्या शिक्षणतंज्ज्ञाच्या मुलाखती घेईल.

१.१५ माहिती संकलन :

निवडलेल्या साधनांच्या मदतीने माहितीचे संकलन केले जाते. जमा झालेली माहिती निष्कर्षासाठी सुव्यवस्थितपणे मांडली जाते. त्यास माहितीचे संकलन म्हणतात.

सदर संशोधनात संशोधिकेने प्रमाणित करुन घेतलेली प्रश्नावली वारली जाईल. न्यादर्शात निवड झालेल्या शिक्षक, पालकाकडून प्रश्नावली भरुन घेण्यात येईल. यावरुन विद्यार्थ्यांच्या विकासात येणाऱ्या समस्या शोधल्य जातील व तसेच शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षणतज्ज्ञाच्या मुलाखती घेतल्या जातील.

१.१६ संकलीत माहींचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :

सदर संशोधनाच्या माहितीचे संकलन करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. संशोधनात शिक्षकाकडून, पालकाकडून माहिती मिळवण्यासाठी 'प्रश्नावलीचा' वापर करण्यात येईल.

तसेच शिक्षणतज्ज्ञाच्या मुलाखतीद्वारे प्राप्त माहितीचा ही वापर अर्थनिर्वचनासाठी करण्यात येईल.

प्रश्नावलीद्वारे प्राप्त निष्कर्ष, मुलाखतीद्वारे प्राप्त माहिती यांच्या निष्कर्षाने पडताळल्या जातील.

१.१७ संशोधनाची व्याप्ती :

१) सदर संशोधनात नांदेड जिल्ह्यातील पुर्व प्राथमिक स्तरावरील शाळांचा विचार केला जाणार आहे.

२) सदर संशोधनात प्री प्रायमरी इंग्रजी मेडियम शाळा व मराठी माध्यमाच्या (अंणवाडी, बालवाडी) शाळाचा विचार केला जाणार आहे.

३)	सदर संशोधनात पूर्व - प्राथमिक स्तरावरील म्हणजे ३ ते ६ वयोगटातील बालकाचा विचार केला जाणार आहे.

४)	सदर संशोधनात, नमुना निवडीतील पालक, शिक्षक यांचाच विचार केला जाणार आहे.

५)	स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत येणाऱ्या २० शिक्षणतज्ज्ञाच्या मुलाखती घेण्या येणार आहेत.

६)	संशोधनाचे निष्कर्ष हे स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड जिल्ह्यातील पूर्व - प्राथमिक स्तरावरील बालकांच्या शिक्षणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील.

समाजाचा पूर्व - प्राथमिक स्तरावरील बालकाकडे पाहण्याचा दृष्टीकोण सकारात्मक व मानसशास्त्रीय दृष्टीने करेल असा विश्वास संशोधिकेला आहे.

१.१८ मर्यादा :

१)	सदर संशोधनात फक्त पूर्व प्राथमिक स्तरावरील म्हणजे ३ ते ६ वयोगटातील बालकांचाच विचार केला जाणार आहे.

२)	सदर संशोधन नांदेड जिल्ह्यापुरते मर्यादीत असेल.

३)	सदर संशोधन हे स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठापुरते मर्यादित असेल.

४)	सदर संशोधनात पूर्व-प्राथमिक शिक्षणाचाच विचार केला जाणार आहे.

१.१९ संशोधनाचा कालावधी :

१)	समस्या निश्चिती	→	३० दिवस
२)	प्रश्नावली निर्मिती	→	१७० दिवस
३)	विद्यालय सर्वेक्षण	→	२३० दिवस
४)	माहितीचे अर्थनिर्वचन	→	२१० दिवस
५)	प्रुफ रिडिंग	→	६० दिवस
६)	छपाई	→	३० दिवस
७)	पुस्तक बांधणी	→	२० दिवस
	एकुण दिवस	→	**१११० दिवस**